# शेतकरी उत्पादक कंपनी आणि ग्राहक पुरवठा साखळीचे व्यवस्थापन



**प्रा. परमेश्वरी पवार**
(मो.नं. ९०९६६४०६४३)
**प्रा. तुषार उगले**
**प्रा. स्नेहल सोनवणे**
कृषी विस्तार शिक्षण विभाग,
क.का. वाघ कृषी महाविद्यालय, नाशिक






शेतकरी उत्पादक कंपनीची नोंदणी झाल्यापासून पुढील ५ वर्षे तिच्या नफ्यावर कोणताही कर भरावा लागणार नाही. शासनाने सन २०१९-२० च्या बजेटमध्ये 'ऑपरेशन ग्रीन'ला मंजुरी दिलेली आहे. शेतकरी उत्पादक कंपन्यांना जास्तीत जास्त कर्ज मिळण्यामध्ये सुलभता असते. नाबार्ड कडून सवलतीच्या दरात कर्ज उपलब्ध होते. तसेच विविध प्रकल्पांसाठी अनुदान नाबार्डच्या प्रोड्युसर ऑर्गनायझेशन डेव्हलपमेंट फंड तर्फे विविध प्रकारचे कर्ज उपलब्ध होते.

शेतकरी उत्पादक कंपनी हे कंपनीचे कायदेशीर स्वरूप असून, तिची कंपनी कायदा १९५६ व २०१३ नुसार नोंदणी होते. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी आणि पर्यायाने कृषी उत्पादकापासून कृषी उद्योजक बनण्यासाठी अनेक शेतकऱ्यांनी एकत्र येऊन स्थापन केलेली संस्था म्हणजे शेतकरी उत्पादक कंपनी- याला 'फार्मर्स प्रोड्युसर कंपनी' (एफ.पी.सी. किंवा एफ.पी.ओ.) असेही म्हटले जाते. या संस्थेची नोंदणी उत्पादक संस्था म्हणून उद्योग मंत्रालयांतर्गत कंपनी कायदा २००२-२०१३ नुसार केली जाते.

**शेतकरी उत्पादक कंपन्यांना मिळणारे विविध फायदे आणि योजना**

शेतकरी उत्पादक कंपनीची नोंदणी झाल्यापासून पुढीत ५ वर्षे तिच्या नफ्यावर कोणताही कर भरावा लागणार नाही. शासनाने सन २०१९-२० च्या बजेटमध्ये 'ऑपरेशन ग्रीन'ला मंजुरी दिलेली आहे. शेतकरी उत्पादक कंपन्यांना जास्तीत जास्त कर्ज मिळण्यामध्ये सुलभता असते. नाबार्ड कडून सवलतीच्या दरात कर्ज उपलब्ध होते. तसेच विविध प्रकल्पांसाठी अनुदान नाबार्डच्या प्रोड्युसर ऑर्गनायझेशन डेव्हलपमेंट फंड (PODD) तर्फे विविध प्रकारचे कर्ज उपलब्ध होते.

कर्जावरील व्याजदर दुसऱ्या कंपन्यांच्या तुलनेत कमी असतो.

सहकारी संस्थांना दिल्या जाणाऱ्या विविध योजना उत्पादक कंपन्यांना दिल्या जातात. समूह शेती तसेच समूह शेतीला लागणारे तंत्रज्ञान अगदी सुलभतेने उपलब्ध करून दिले जाते.

SFAC, New Delhi या संस्थेकडून उत्पादक कंपन्यांना १५ लाख रुपयांपर्यंत इक्विटी ग्रँट दिली जाते.

क्रेडिट गॅरंटी फंड : SFAC, New Delhi या संस्थेकडून उत्पादक कंपन्यांना त्यांच्या प्रोजेक्टच्या ८५% किंवा जास्तीत जास्त १ कोटी रुपयांपर्यंतचे कर्ज विनातारण व कमी व्याज दराने दिले जाते.

**शेतकरी उत्पादक कंपनीची कामे**

शेतकऱ्यांकडून नवीन उत्पादन घेणे, हार्वेस्टिंग, ग्रेडिंग करणे, माल एका ठिकाणी जमा करणे, मालाची हाताळणी करणे, मालावर प्रक्रिया करणे, मार्केटिंग व मोठ्या प्रमाणावर मालाची विक्री करणे.

कंपनी सभासदांमार्फत आयात- निर्यात करणे, निर्माण झालेल्या उत्पादनाचे किंवा मालाचे प्रोसेसिंग व पॅकिंग करून नवीन ब्रँड तयार करून विकणे.

**ग्राहक पुरवठा साखळी म्हणजे काय ?**

उत्पादन ग्राहकांपर्यंत मागणीनुसार पोहोचवण्यासाठी तसेच विविध सेवा ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी असलेली व्यवस्था म्हणजे पुरवठा साखळी (सप्लाय चेन) होय. अर्थातच कोणतेही उत्पादन ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी तसेच विविध सेवा ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी पुरवठा साखळी अत्यंत आवश्यक असते.

**विविध शहरांमध्ये पुरवठा साखळी कशी निर्माण करता येईल ?**

शहरालगतच्या भागातील शेतकरी उत्पादक ते शहरातील ग्राहक यांच्यामधील मध्यस्थ व इतर घटक कमी करून ग्राहकांना स्वस्त व ताजा भाजीपाला मिळवून देता येईल. यातून थेट विक्री केल्यानंतर शेतकरी वर्गास जास्त नफा मिळेल.

**विविध शहरांत शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत बाजारपेठ कशी उपलब्ध होईल ?**

शहराच्या १५ ते २० कि.मी. परिसरामध्ये भाजीपाला पिकविणाऱ्या गावात असणाऱ्या शेतकरी उत्पादक कंपन्यांमार्फत शहरातील मोक्याच्या ठिकाणी तसेच सोसायटी कॅम्पसमध्ये भाजीपाला आऊटलेट्स सुरु करून FPC आपली हक्काची बाजारपेठ उपलब्ध करू शकते.

**शहरातील बाजारपेठेत भाजीपाला ग्राहकांचा कल कसा असतो ?**

ताजा भाजीपाला, फळे, दूध यासारख्या रोज लागणाऱ्या वस्तू तसेच अंडी यासाठी चांगला ग्राहक वर्ग शहरात उपलब्ध आहे. सध्या विदेशी भाजीपाला खाणारे ग्राहक शहरात वाढत आहेत तसेच मशरूमसारख्या उत्पादनांना देखील मागणी



वाढत आहे. अशा नवनवीन प्रयोगांतून उत्पादित माल तसेच नाशवंत भाजीपाला, फळे ताज्या स्वरूपात उपलब्ध झाल्यास त्यातून ग्राहक टिकून राहतील. हंगामानुरूप ग्राहकांच्या गरजा ओळखून त्याप्रमाणे भाजीपाला व इतर गोष्टी पुरवणे शक्य होईल.

जसे की, मागील महिन्यात मकरसंक्रांत हा सण येऊन गेला. त्यासाठी लागणारे ऊस, हरभरा, बोरे व इतर गोष्टींचे पॅकेट, दसऱ्याच्या वेळेस झेंडूची फुले अशा प्रकारची सेवा शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत ग्राहकांना दिली जाऊ शकते.

**धान्य विक्रीसाठी शेतकरी उत्पादक कंपनी काय करू शकते ?**

हंगामानुसार गहू, बाजरी, ज्वारी, नागली या सर्व धान्यांचे ५ ते १० किलो आकर्षक पॅकिंगमध्ये उपलब्ध करून दिल्यास ग्राहक त्याचा लाभ घेतील. याबरोबरच पापड, शेवया, मांडे यासाठी उपयुक्त अशा विशिष्ट वाणांची उपलब्धता शेतकरी उत्पादक कंपन्या करू शकतात.

**पुरवठा साखळीत काढणीपश्चात करावयाच्या महत्त्वाच्या बाबी**

भाजीपाला आऊटलेट्स ते विक्री केंद्रापर्यंत ताजा भाजीपाला पोहोचविण्यासाठी वातानुकुलित वाहनांचा उपयोग करावा.

विक्री केंद्रावर शेतमालाची आर्द्रता- ताजेपणा राखण्यासाठी कूलर वा पर्यायी व्यवस्था करावी.

योग्य पॅकिंग पद्धतीचा उपयोग करावा- जसे की हिरव्या भाजीपाल्यासाठी नायट्रोजन गॅस पॅकिंग, धान्यासाठी व्हॅक्युम पॅकिंगचा उपयोग करावा, मान्यताप्राप्त ग्रेडच्या प्लास्टिक पाऊचचा वापर करून बेदाणे, मनुके काजू यांची विक्री करता येते.

भाजीपाल्यावर अति थंड तापमानात प्रक्रिया करून फ्रोजन हिरव्या वाटाण्यासारखी विक्री करणे शक्य आहे.

**ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी नवीन प्रयोग**

शेतकरी उत्पादक कंपनीमार्फत हंगामानुसार विविध प्रदर्शने व महोत्सवांचे आयोजन करून उत्पादनाची जाहिरात करता येईल.

विविध प्रकारच्या बास्केट- जसे की धान्य बास्केट. यात आपण वेगवेगळ्या धान्यांच्या ५ किलोच्या बॅग, आंबा बास्केटमध्ये विविध जातींचे आंबे, फेस्टिवल बास्केट, एग्झॉटिक फ्रूट बास्केट, भाजीपाला बास्केट ग्राहकांसाठी उपलब्ध करून देता येईल. याबरोबरच उन्हाळी कांद्याची साठवण क्षमता जास्त असल्याने जून ते नोव्हेंबरपर्यंत ग्राहकांच्या गरजेप्रमाणे पुरवठा करता येईल. लाल कांदा जानेवारीपासून एप्रिलपर्यंत बाजारात उपलब्ध असतो- त्याची पॅकिंग करून विक्री होऊ शकते.

आकर्षक किंमत व ऑफर, सोशल मीडियावर जाहिरातीद्वारे सुद्धा ग्राहकांना आकर्षित करता येईल.

नियमित ग्राहकांचा अभिप्राय जाणून घेऊन त्यांच्या मागणीनुसार उत्पादन उपलब्ध करून देता येईल.

**शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या पुरवठा साखळी व्यवस्थापनातील आव्हाने**

थेट विक्री आणि घरोघरी विक्री सेवेमध्ये शेतीमाल पुरवठा करण्यासाठी पणन तसेच पुरवठा सेवा याबाबत अनेक समस्या उद्‌भवू शकतात. ग्राहकांच्या मागणीचा



काळजीपूर्वक अभ्यास गरजेचा असतो. ग्राहकांच्या मागणीचा स्तर जाणून घेणे अवघड वाटू शकते. काही दिवशी विशिष्ट भाजीपाला उत्पादनांना मोठी मागणी राहते आणि त्यामुळे इतर उत्पादनांची विक्री होत नाही.

ग्राहकांच्या मागणीनुसार पुरवठा करण्याच्या असमर्थतेचा परिणाम 'एफपीसी'च्या कामगिरीवर होऊ शकतो. भाजीपाला उत्पादनांची साठवण क्षमता अल्प असून, अति नाशवंत असल्याने त्यांची साठवण करून नंतर विक्री करता येत नाही. दैनंदिन गरजेचा सर्व भाजीपाला व फळे दररोज ताज्या स्वरुपात उपलब्ध झाली पाहिजेत, यासाठी उत्पादक विक्री केंद्राच्या जवळ असावा.